# नवरात्र घटस्थापना

नऊ दिवस नवरात्रीचे जागृत दर्शन श्रीस्वामी मातेचे
अर्पूया भक्तिभाव सप्रेमे, पुष्पांजलीत प्रेम हृदयाचे
कार्यारंभी गणपती पूजन वंदू आईचे चरण
प्रथमदिनी ध्यान पूजन स्तुति मंत्रांचे मधुर पठण
द्‌वितीय दिनी पाठ सप्तशतीचा करू प्रसन्न आईला
तृतीय दिवस उत्तम मोठा कुंकुमार्चन पूजन देवीला
गोंधल आरत्या जागरण आनंद चौथ्या दिवसाला
दिवस पंचमीचा रंगुनी जाऊ ललिता सहस्त्र नामात
स्वामीमाता त्तृप्त होऊनी शांती देईल चित्तात
षष्ठीचे दिवशी व्रत उपंाग ललितेचे हो
धूपदीप नैवेद्‌य फल तांबूल अर्पूया तुला माते हो
सप्तमीचे दिवशी सप्तश्रृंग गडावर निवासीनी हो
हिरवा शालू नि अलंकार लेवूनी उभी प्रसन्न माते हो
जल्लोष आनंद भक्तगणांचा, झाले नयन तृप्त तुझे हो
अष्टमीचे दिवशी थाट उत्सवाचा मोठा भारी
होम हवन तर्पण सेविता स्वामी अंबा संतुष्ट भक्तावरी
कुमारिका सुवासिनी ब्राह्मण भोजन अर्पिता स्वामी माता संतुष्ट
नवमीचे दिवशी अभय वरदहस्ते नष्ट करि सारे अरिष्ट
स्वामी अमुची माय माउली
प्रेमासाठी सदैव भुकेली
दिवस रंगले नवरात्रीचे नवविध भक्तिरंगांनी
वर्षाव कृपेचा भक्तावरी
मातेचा प्रसन्न नेत्रांनी
जगदंबेचा उदो उदो स्वामी मातेचा जयजयकार हो
प्रेमभक्तीचा नजराणा अर्पूया मातेच्या चरणी हो..........

**हेमा जोशी**
**पुणे**